**सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय१०.०००१२२०-२००६**

.

**<u>निशानी क्र.७१ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी पक्रिया संहिता आदेश ०१ नियम १० नुसार दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार सामील करणेसंदर्भात दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की दाव्यात वादग्रस्त जमीनी बाबतचा न्यायालयात दावा प्रलंबित असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. २ प्रदिपकुमार अनंतराव मेटे यांनी वादग्रस्त सर्वे नं. ६/आ/२ मधील ४१ आर क्षेत्र मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना खरेदीखत क्र. १५४०/२०१४ प्रमाणे दि. ०१.०७.२०१४ रोजी बेकायदेशीर विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र. २ याने त्यांची पत्नी संगीता प्रदिपकुमार मेटे यांची संमती घेवुन दाव्यातील वादग्रस्त जमीनी सर्वे नं. २४/२५, २४/२३, २४/२७ मधील काही क्षेत्र मौजे राजेगाव येथील राहणारे दासु दगडु मेटे यांना दि. २४.११.२०१७ रोजी खरेदीखत क्र. २७१३/२०१७ प्रमाणे विक्री केल्याचे वादीस दि. १०.०२.२०२० रोजी समजले. करिता दाव्यात प्रतिवादी म्हणुन प्रतिवादी नं. २ ची पत्नी संगिता प्रदिपकुमार मेटे हिला प्रतिवादी नं. ६ व जमीन खरेदी करणार दासु दगडु मेटे यांना प्रतिवादी नं. ७ म्हणुन व प्रतिवादी नं. ८ म्हणुन मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना दाव्यात शरीक करणे जरूरी व आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात वादीस प्रतिवादी सदरात प्रतिवादी नं. ६ संगीता प्रदिपकुमार मेटे, वय-३९ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज. जि. बीड, प्रतिवादी नं. ७ दासु दगडु मेटे, वय-६८ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड, प्रतिवादी नं. ८ मच्छिंद्र दत्तात्रय कदम, वय-४६ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज. जि. बीड यांना दाव्यात शरीक करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

४. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी प्रस्तुत अर्जामध्ये कोणतीही विंनती नमुद केली नाही त्यामुळे वादी यांचा अर्ज व हा खारीज करण्यात यावा.

५. प्रतिवादी क्र. १ यांना अर्जास म्हणणे दाखल करण्याकामी पुरेशी संधी देउनही आपले कोणतेही म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ यांचे विरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात यावा.

७. वादी यांनी सदर अर्जाकामी दि. ०१.०७.२०१४ रोजीचे खरेदीखत क्र. १५४०/२०१४ ची प्रत आणि दि. २४.११.२०१७ रोजीचे खरेदीखत क्र. २७१३/२०१७ ची प्रत इ. कागदपत्र दाखल केली आहेत.

८. प्रस्तुत अर्ज व म्हणणे अवलोकीले. वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश क्र. १ नियम क्र. १० नुसार दाव्यामध्ये संगिता प्रदिपकुमार मेटे यांना प्रतिवादी क्र. ६ म्हणून दासु दगडू मेटे यांना प्रतिवादी क्र. ७ म्हणून आणि मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना प्रतिवादी क्र. ८ म्हणून शरीक करण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की दाव्यात वादग्रस्त जमीनी बाबतचा न्यायालयात दावा प्रलंबित असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. २ प्रदिपकुमार अनंतराव मेटे यांनी वादग्रस्त सर्वे नं. ६/आ/२ मधील ४१ आर क्षेत्र मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना खरेदीखत क्र. १५४०/२०१४ प्रमाणे दि. ०१.०७.२०१४ रोजी बेकायदेशीर विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र. २ याने त्यांची पत्नी संगीता प्रदिपकुमार मेटे यांची संमती घेवुन दाव्यातील वादग्रस्त जमीनी सर्वे नं. २४/२५, २४/२३, २४/२७ मधील काही क्षेत्र मौजे राजेगाव येथील राहणारे दासु दगडु मेटे यांना दि. २४. ११.२०१७ रोजी खरेदीखत क्र. २७१३/२०१७ प्रमाणे विक्री केल्याचे वादीस १०.०२.२०२० रोजी समजले. करिता दाव्यात प्रतिवादी म्हणुन प्रतिवादी नं. २ ची पत्नी संगिता प्रदिपकुमार मेटे हिला प्रतिवादी नं. ६ व जमीन खरेदी करणार दासु दगडु मेटे यांना प्रतिवादी नं. ७ म्हणुन व प्रतिवादी नं. ८ म्हणुन मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना दाव्यात शरीक करणे जरूरी व आवश्यक आहे. वादी यांनी सदर अर्जामध्ये नमुद केलेल्या मजकुरा संदर्भात कागदोपत्री पुरावा म्हणजेच दि. ०१.०७.२०१४ रोजीचे खरेदीखत क्र. १५४०/२०१४ ची प्रत आणि दि. २४.११.२०१७ रोजीचे खरेदीखत क्र. २७१३/२०१७ ची प्रत दाखल केली आहे. वादीने सदर अर्जामध्ये नमुद केलेल्या मजकुरा संदर्भात कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर दाखल केला आहे.

९. वादीने दाखल केलेल्या दि. ०१.०७.२०१४ रोजीचे खरेदीखत क्र. १५४०/२०१४ याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरचे खरेदीखत हे वादग्रस्त सर्व्हे नं. ६/आ/२ मधील ४१ आर क्षेत्र या संदर्भातील असून सदर खरेदीखतास लिहून घेणार

म्हणून मच्छिंद्र दत्तात्रय कदम आणि लिहून देणार म्हणून प्रदिपकुमार अनंत मेटे यांचे नाव नमूद आहे. तसेच दि. २४.११.२०१७ रोजीचे खरेदीखत क्र. २७१३/२०१७ याचे अवलोकन केले असता सदरचे खरेदीखत हे वादग्रस्त सर्व्हे क्र. २४/२५, २४/२३ आणि २४/२७/ग या मिळकती संदर्भात असून सदर खरेदीखतास लिहून घेणार म्हणून दासू दगडू मेटे, लिहून देणार म्हणून प्रदिपकुमार अनंतकुमार मेटे आणि संमती देणार म्हणून संगिता प्रदिपकुमार मेटे यांची नावे नमूद आहेत. वादीने सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र. ६ म्हणून संगिता प्रदिपकुमार मेटे, प्रतिवादी क्र. ७ म्हणून दासु दगडु मेटे आणि प्रतिवादी क्र. ८ म्हणून मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना दाव्यामध्ये शरिक करावे असे नमूद केले आहे. खरेदीखत क्र. १५४०/२०१४ आणि खरेदीखत क्र. २७१३/२०१७ यांचे अवलोकन केले असता संगिता प्रदिपकुमार मेटे, मच्छिंद्र दत्तात्रय कदम आणि दासु दगडू मेटे यांची नावे सदर खरेदीखतांना लिहून घेणार व संमती देणार या सदरी नमूद केलेली आहेत. तसेच सदरची खरेदीखते ही वादग्रस्त मिळकती संदर्भात असल्याची दिसून येते. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्याकरीता प्रतिवादी क्र. ६ म्हणून संगिता प्रदिपकुमार मेटे, प्रतिवादी क्र. ७ म्हणून दासु दगडु मेटे आणि प्रतिवादी क्र. ८ म्हणून मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांना शरिक करणे आवश्यक वाटते. सदर प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यामध्ये शरिक केले असता दाव्याचा अंतिम निकाल लागण्याकरीता मदत होणार आहे. तसेच सदर प्रस्तावित प्रतिवादी हे सदर दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येते.

१०. एकूणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता असे निदर्शनास येते की वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेल्या कथना संदर्भात वादी यांनी कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर दाखल केला आहे. तसेच खरेदीखत क्र. १५४०/२०१४ आणि खरेदीखत क्र. २७१३/२०१७ याचे अवलोकन केले असता सदरचे खरेदीखते ही वादग्रस्त मिळकती संदर्भात असल्याचे दिसून येते. तसेच सदर खरेदीखताच्या लिहून घेणार सदरी दासू दगडू मेटे आणि मच्छिंद्र दत्तात्रय कदम यांची नावे आणि संमती देणार म्हणून संगिता प्रदिपकुमार मेटे यांचे नाव असल्याचे नमूद आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ म्हणून संगिता प्रदिपकुमार मेटे, वय-३९ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड, प्रतिवादी क्र. ७ म्हणून दासु दगडु मेटे, वय-६८ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड आणि प्रतिवादी क्र. ८ म्हणून मच्छिंद्र दत्तात्रय कदाम, वय-४६ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड यांना दाव्यामध्ये शरीक करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार केला असता सदरचा अर्ज हा मंजूर

होण्यास पात्र आहे. सबब त्याकरीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज हा मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना असे आदेशित करण्यात येते की प्रतिवादी क्र. ६ म्हणून संगिता प्रदिपकुमार मेटे, वय-३९ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड, प्रतिवादी क्र. ७ म्हणून दासु दगडु मेटे, वय-६८ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड आणि प्रतिवादी क्र. ८ म्हणून मच्छिंद्र दत्तात्रय कदाम, वय-४६ वर्षे, धंदा-शेती, रा. राजेगाव, ता. केज, जि. बीड यांना दाव्यामध्ये शरीक करावे आणि तशी दुरुस्ती करन दावा दुरुस्ती प्रत ही सदर आदेश पारीत झालेपासून १४ दिवसांच्या आत सदर प्रकरणामध्ये दाखल करावी.

दिनांक १४/०९/२०२०

(एस.व्ही.जंगमस्वामी )
२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 14.09.2021 |
| Transcribed on | : | 14.09.2021 |
| Checked & signed on | : | 14.09.2021 |

Sd/-
(S.Y. Gore)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.